ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 38 ]
Total No. of Questions : 38 ]

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**
**Code No. : 85-M**

**B**

**CCE RR**
**UNREVISED**
**REDUCED SYLLABUS**

Question Paper Serial No. **411**

येथून कापा.

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ( समाज विज्ञान )

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಮಾಧ್ಯಮ / Marathi Medium )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 15. 06. 2023 ] [ Date : 15. 06. 2023
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ] [ Max. Marks : 80

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

### विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्नपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ आणि विषयनिष्ठ प्रकारचे 38 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. प्रश्नपत्रिकमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. वस्तुनिष्ठ आणि विषयनिष्ठ प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

**Tear here**

**I. खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा : $8 \times 1 = 8$**

1. दुसरे अँग्लो-मराठा युद्ध या तहाने संपुष्टात आले.

   (A) सालबाईचा तह

   (B) लाहोरचा तह

   (C) बासेन ( वसई ) चा तह

   (D) मद्रासचा तह

2. ब्रिटिशानी धोंडिया वाघ याला या ठिकाणी ठार मारले.

   (A) शिकारिपूरा

   (B) रायचूर

   (C) शीरहट्टी

   (D) कोनगल

3. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ( UNO ) सुरक्षा समितीत भारताला कायमचे सदस्यत्व मिळावे या साठी हा देश पाठींबा देत आहे.

(A) अमेरिका ( USA )

(B) ब्रिटन

(C) रशिया

(D) फ्रान्स

4. नर्मदा बचाव आंदोलनाचे नेतृत्व यानी केले.

(A) शिवराम कारंथ

(B) संदरलाल बहुगुणा

(C) मेधा पाटकर

(D) कुसूम सोरब

5. सतलज नदीवर बांधण्यात आलेली नदीखोऱ्यातील बहुउद्देशोय योजना ही आहे.

(A) भाक्रा-नानगल योजना

(B) हीराकूड योजना

(C) पंपासागर

(D) नागार्जून सागर योजना

6. भारताचे 'सिलीकॉन शहर' हे आहे.

(A) मुंबई

(B) चेन्नई

(C) दिल्ली

(D) बेंगळूरू

7. बँकेकडून नागरिकाना आपल्या अमूल्य वस्तू आणि दागिणे सुरक्षित ठेवण्यासाठी ही सेवा दिली जाते.

(A) बचत खाते सेवा

(B) सेफ डिपॉझिट लॉकर्स सेवा

(C) मुदत ठेव सेवा

(D) चालू खाते सेवा

8. ''खेड्यांचा विकास हाच भारताचा खरा विकास आहे'' असे यानी म्हटले.

(A) सर एम. विश्वेश्वरय्या

(B) महात्मा गांधी

(C) डॉ. बी. आर. आंबेडकर

(D) जवाहरलाल नेहरू

**II. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तर लिहा : 8 × 1 = 8**

9. हरिपूरा येथील राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनचे अध्यक्ष कोण होते ?

10. 'अभिनव भारत' हो गुप्त संघटना कोणी सुरु केली ?

11. 'मानव हक्क दिवस' केंव्हा साजरा केला जातो ?

12. अस्पृश्यतेला महात्मा गांधीजीनी काय म्हटले ?

13. भारतातील अती कमी पाऊस पडणारे ठिकाण कोणते ?

14. श्रम विभागणीबद्दल प्लेटो यांनी काय म्हटले ?

15. ग्रामीण प्रदेशात महिला स्वसहाय्य संघ का आस्तीत्वात आले ?

16. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र कोणत्या खात्याकडून वितरित केले जाते ?

**III. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन ते चार वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा :**

**8 × 2 = 16**

17. पंचशील तत्वे कोणती ?

**किंवा**

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रातील वसाहत शाहीची प्रमुख लक्षणे कोणती ?

18. सामाजिक स्तर देशानूसार कसा भिन्न आहे ?

**किंवा**

'शांत दरी चळवळ' ( सायलेंट व्हॅली आंदोलन ) का आयोजीत करण्यात आली ?

19. तीसऱ्या अँग्लो-मराठा युद्धाचे परिणाम कोणते ?

20. पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोवा कसा मुक्त झाला ?

21. चहा पीक वाढीसाठी आवश्यक असलेले घटक कोणते ?

22. दळणवळणाचे ( संपर्क माध्यमे ) महत्त्व कोणते ?

23. जॉन. एफ. केनडी यांनी अमेरिकन ग्राहकांना दिलेले हक्क कोणते ?

24. मानवी विकासाचे सूचांक कोणते ?

**IV. खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात / मुद्यात उत्तरे लिहा : 9 × 3 = 27**

25. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील बाळ गंगाधर टिळक यांच्या भूमिकेचे वर्णन करा.

**किंवा**

संगोळ्ळी रायण्णाने ब्रिटिशांविरुद्ध केलेल्या बंडाचे वर्णन करा.

26. भारतीयांना हिमालयाचा उपयोग कसा होतो ?

**किंवा**

सध्याच्या दिवसात मातीची धूप आम्ही कशी थांबवितो ?

27. ग्रामीण विकासामध्ये पंचायत राज संस्थेची भूमिका लिहा.

**किंवा**

ग्रामीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कृती लिहा.

28. बँक खाते उघडण्यासाठी अवलंबिल्या जाणाऱ्या पायऱ्या कोणत्या ?

**किंवा**

ग्राहक संरक्षण कायद्याचे उद्देश कोणते ?

29. प्रार्थना समाजाच्या सुधारणांचे वर्णन करा.

30. भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध अपयशी ठरले याची कारणे कोणती ?

31. भारत आणि अमेरिका ( U.S.A. ) यांच्या संबंधाचे वर्णन करा.

32. अती जास्त लोकसंख्या असलेल्या भारतातील बेरोजगाराची समस्या आम्ही कशी सोडवू शकतो ?

33. चक्रीवादळाचे प्रतिबंधात्मक उपाय कोणते ?

**V. खालील प्रश्नांची प्रत्येको आठ वाक्यात / मुद्यात उत्तर लिहा : 4 × 4 = 16**

34. ब्रिटिश शिक्षणाचा भारतीयांच्यावर परिणाम झाला. या विधानाचे समर्थन करा.

**किंवा**

असहकार चळवळी दरम्यान घडलेले प्रमुख विकास कोणते ?

35. "डॉ. बी. आर. आंबेडकर हे थोर समाज सुधारक होते." या वाक्याच समर्थन करा.

36. भ्रष्टाचाराचे परिणाम कोणते ?

37. भारतातील अरण्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणते उपाय हाती घेतले आहेत ?

**VI.** 38. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :** **1 + 4 = 5**

a) दामोदर दरी

b) भद्रावती

c) कांडला

d) बेंगळूरू

**अंध विद्यार्थ्यांसाठी पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 38 च्या ऐवजी )**

नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनेचे प्रमुख उद्देश कोणते ? **5**